# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 14 May 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १४ मे २०२४ दुपारी १.०० वा.

****

लोकसभा निवडणुकीच्या सातव्या आणि अंतिम टप्प्यासाठी अर्ज करण्याचा आज शेवटचा दिवस आहे. या टप्प्यात सात राज्यं आणि एका केंद्रशासित प्रदेशातल्या सत्तावन्न लोकसभा जागांसाठी येत्या एक जूनला मतदान होणार आहे.

****

भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज वाराणसी मतदारसंघातून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या मतदारसंघातून अर्ज भरण्याची मोदी यांची ही सलग तिसरी वेळ आहे. अर्ज दाखल करण्याआधी पंतप्रधानांनी वाराणसीतल्या काल भैरव मंदिरात पूजा केली.

****

येत्या वीस तारखेला मतदान होणार असलेल्या निवडणुकीच्या पाचव्या टप्प्याच्या प्रचारानं वेग घेतला असून सगळ्या पक्षांचे दिग्गज नेते प्रचार सभा आणि प्रचार फे-या याद्वारे मतदारांशी संवाद साधत आहेत. भाजपचे ज्येष्ठ नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या नाशिक जिल्ह्यातल्या निफाड तालुक्यात पिंपळगाव बसवंत इथे जाहीर सभा घेणार आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे, तसंच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते शरद पवार हे सुद्धा येत्या दोन दिवसात नाशिक जिल्ह्यात जाहीर सभा घेणार आहेत.

नाशिकमध्ये महायुतीच्या प्रचारासाठी उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अजित पवार, पंकजा मुंडे यांच्या सभांचं तर महाविकास आघाडीच्या प्रचारासाठी खासदार अमोल कोल्हे, आमदार रोहित पवार, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, खासदार इम्रान प्रताप गडी यांच्या सभांचं नियोजन केलं जात असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

****

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघात काल पार पडलेल्या मतदानात त्रेसष्ट पूर्णांक सात शतांश टक्के मतदान झालं असून,यात समाविष्ट असलेल्या कन्नड विधानभा मतदरसंघात ६६ पूर्णांक अठ्ठ्याहत्तर,औरंगाबाद मध्य साठ पूर्णांक चाळीस, औरंगाबाद पश्चिम साठ पूर्णांक अडोतीस, औरंगाबाद पूर्व पासष्ट पूर्णांक चव्वेचाळीस गंगापूर चौसष्ट पूर्णांक ऐंशी तर वैजापूर विधानसभा मतदार संघात त्रेसष्ट पूर्णांक सात शतांश टक्के मतदान झालं आहे.

****

दरम्यान,काल तेरा मे ला पार पडलेल्या औरंगाबाद लोकसभा मतदारसंघाच्या मतदानानंतर मतदान यंत्रं स्ट्राँग रूममध्ये जमा करण्याची प्रक्रिया पोलीस बंदोबस्तात पूर्ण झाली आहे.

जालना लोकसभा मतदारसंघातही काल मतदान पार पडलं. या मतदारसंघातली सगळी मतदान यंत्रं जालना औद्योगिक वसाहतीमधल्या सरस्वती ऍटो कंपोनंट्स या ठिकाणी जमा करण्यात येत आहेत. येत्या चार जून रोजी या ठिकाणी मतमोजणी होणार आहे. जालना लोकसभा मतदारसंघात असलेल्या पैठण विधानसभा मतदार संघातली मतदान यंत्रं येणं बाकी असल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी शशिकांत हदगल यांनी दिली आहे.

****

मुंबईत घाटकोपर परिसरात जाहिरात फलक कोसळून झालेल्या दुर्घटना स्थळी सध्या बचाव कार्य सुरू आहे. राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दल,पोलिस दल,केंद्रीय राखीव पोलिस दल आणि अग्नीशमन दलाचे जवान यात सहभागी झाले आहेत. कोसळलेल्या जाहिरात फलकाच्या खाली अजूनही अनेक गाड्या अडकलेल्या आहेत. त्यामुळे मृत आणि जखमींची संख्या आणखी वाढण्याची शक्यता बचाव कार्य करणा-या जवानांनी व्यक्त केली आहे.

मुंबईत घाटकोपर इथे काल वादळी वा-यामुळे झालेल्या या अपघातातल्या मृतांचा आकडा चौदावर गेला आहे.या दुर्घटनेत पंचाहत्तर जण जखमी झाले असून त्यातला एक जण गंभीर आहे.या अपघाताची माहिती मिळताच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे तसंच उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घटनास्थळाला भेट देऊन पाहणी केली. या दुर्घटनेतल्या मृतांच्या नातेवाईकांना पाच लाखांची मदत देणार असल्याची, तसंच,जखमींच्या उपचाराचा खर्च सरकार करणार असल्याची माहिती मुख्यमंत्री शिंदे

यांनी दिली.या दुर्घटनेतल्या दोषी व्यक्तिंवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करून योग्य ती कारवाई करण्यात येणार असल्याचंही मुख्यमंत्र्यांनी सांगितलं आहे.

****

स्वराज्य रक्षक धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या जयंतीच्या औचित्यानं त्यांना आज अभिवादन करण्यात येत आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी, महापराक्रमी धर्मवीर स्वराज्यरक्षक शिवपुत्र छत्रपती संभाजी महाराज यांना जयंती दिनी मानाचा मुजरा, अशा शब्दात आदरांजली वाहिली आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी एका ट्विट संदेशातून छत्रपती संभाजी महाराजांना आदरांजली वाहिली असून, मुघल साम्राज्याला हादरवून सोडणारे धुरंदर राजकारणी, प्रकांड पंडित, कुशल संघटक, स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांना जयंतीनिमित्त विनम्र अभिवादन आणि मानाचा मुजरा, अशा शब्दात आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही, परमप्रतापी शंभूराजे यांना जयंतीदिनी त्रिवार मानाचा मुजरा, अशा शब्दात त्यांना आदरांजली वाहिली आहे.

****

येत्या १७ ते १९ मे या कालावधीत छत्रपती संभाजीनगर इथे जिगिषा नाट्यसहवास कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या कार्यक्रमात मिलिंद सफई स्मृती पुरास्काराचं वितरणही करण्यात येणार आहे. या पुरस्काराचं हे पहिलं वर्ष असून, लेखक–दिग्दर्शक–अभिनेता धनंजय सरदेशपांडे यांना हा पुरस्कार जाहीर झाला आहे.

****